UGC Care Listed Journal

**मराठवाडा इतिहास परिषद,**
**औरंगाबाद**
(रजि.नं. एफ ८२० / दि. २६.०८.१९८२)

**ISSN : 0976 – 5425**

# History Research Journal

# इतिहास संशोधन पत्रिका

**Issue. - XXVIII** **May**
अंक - अठ्ठावीस 2022

कार्यकारी संपादक
**डॉ. सोमनाथ रोडे**

**: संपादकीय मंडळ :**

डॉ. जाकेर पठाण
प्रा. विजय पांडे
डॉ. सुभाष बेंजलवार
डॉ. नारायण सूर्यवंशी
डॉ. प्रभाकर मिरकड
डॉ. विनोद बोरसे
डॉ. बब्रुवान मोरे

या अंकात व्यक्त केलेली विचार-मते ही मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद अथवा संपादक किंवा संपादक मंडळ यांची अधिकृत मते नाहीत. त्यांच्याशी ते सहमत असतीलच असे नाही.

Govt. College of Arts & Science Aurangabad.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

| अ.क्र. लेखक | पृष्ठांक | शीर्षक |
|---|---|---|
| १३. Shri. Baliram J. Paikrao | १०७ | Bhoodan Movement A Bloodless Revolution |
| १४. प्रा. रूपेश मडकर | ११५ | धार्मिक उत्पत्तीनिमित्त, जैनमित्र अवतार : वासाहतिक महाराष्ट्रातील दिगंबर जैन समाज व वर्ग जातीतील सत्कार संघर्ष |
| १५. डॉ. आर. व्ही. गंगणे | १२३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठअंतर्गत बीड जिल्ह्यातील स्त्रियांचे सामाजिक कार्य |

गोषवारा

| | | |
|---|---|---|
| १. डॉ. वंदना राजेश शिंदे | १३२ | स्वातंत्र्य लढ्यातील पहिले क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके -एक चिकित्सक अभ्यास |
| २. प्रा. शशिकांत भालचंद्र पाटील | १३५ | लखनौ करार : भारतीय राष्ट्रवादाशी तडजोड |
| ३. श्री. अंकुश बुद्धिवंत गरुड | १३७ | उस्मानाबाद जिल्ह्यातील ऐतिहासिक किल्ले : पर्यटन आणि संवर्धन |
| ४. श्रीमती भारती अण्णासाहेब खोतकर | १४० | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार |
| ५. कु. वसुंधरा दिवाणराव शिंदे | १४२ | भारतावर दीर्घकाळ राज्य करणारी ईस्ट इंडिया कंपनी : एक ऐतिहासिक अभ्यास |
| ६. प्रा. इस्माईल महेबूब शेख | १४४ | हैद्राबाद संस्थानातील सर सालारजंग यांच्या महत्त्वपूर्ण प्रशासकीय सुधारणा : एक अभ्यास |


Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

१४

# बोधवित्त उन्नतिनिमित्त, जैनमित्र अवतार : वासाहतिक महाराष्ट्रातील दिगंबर जैन समाज व वर्गजातीतील सहकार-संघर्ष

प्रा. रूपेश मडकर
शासकीय ज्ञान-विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

भारतातील सर्वात जुन्या धर्मांपैकी जैन हा एक धर्म आहे. भारतीय परिप्रेक्ष्यात काळाच्या ओघात अनेक प्राचीन पंथ वा धर्म लोप पावले परंतु आजही आपली ओळख (Identity) या धर्माने टिकवून ठेवली आहे. त्यामुळे या धर्माचा अभ्यास करणे हे महत्त्वाचे ठरते तसेच भारताच्या इतिहासात विविध कालखंडांत या समाजाने आर्थिक प्रभुत्व राखले आहे.[१] यामुळेसुद्धा या समाजात सामाजिक गतिमानता कोणत्या प्रकारची होती, या समाजाकडे बदलत्या राजकीय, आर्थिक व सामाजिक अवकाशात आर्थिक प्रभुत्व राखण्याचे मार्ग कोणते होते आदी बाबींचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. ऐकोणविसाव्या शतकापासून ब्रिटिश आधिपत्याखालील भारतात व संस्थानात मोठी घुसळण सुरु झाली. पाश्चिमात्त्य संस्कृतीशी होत असलेली देवाण-घेवाण, वसाहतिक व्यवस्था, आधुनिक शिक्षण, नव्या राजकीय संकल्पना तसेच वसाहतिक सत्तेने निर्माण केलेल्या नव्या व्यवस्था उदाहरणार्थ दशवार्षिक जनगणना व विविध सर्व्हेक्षण यामुळेही घुसळण जास्त गतिमान झाली व यातून संस्कृती, समाज, धर्म व अस्मिता याबद्दलच्या नव्या व्याख्या रुजायला लागल्या.[२] व्यापार व वाणिज्यात जैन समाज अग्रभागी असल्यामुळे होणारी स्थलांतरे त्याचबरोबर राजकीय, धार्मिक व सामाजिक कारणामुळेहोणारी स्थलांतरे यामुळे एकूणच कमी लोकसंख्या असलेल्या या समाजाचे वितरण भारताच्या सर्व भौगोलिक प्रदेशात झालेले दिसते. परंतु भारतातील वसाहतिक सत्तेने निर्माण झालेला अवकाश व व्यापार आणि वाणिज्याच्या संधी पदरात पाडून घेण्यासाठी अठराव्या व एकोणविसाव्या शतकात महाराष्ट्रात व विशेषत: मुंबई व पश्चिम महाराष्ट्रात भारतातून व विशेषत: गुजरातमधून मोठ्या प्रमाणात स्थालांतरे झाली.[३]


UGC Care Listed Journal : ISSN : 0976 - 5425

Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ब्रिटिशांच्या प्रशासकीय धोरणांचा परिणाम इथल्या वर्णजाती व्यवस्थेवर होणे अपरिहार्य होते. सामाजिक दर्जा प्राप्त करून देणारी वर्णजाती व्यवस्थेची चौकट थोडी ढिली होऊ लागली व ब्रिटिश राज्यव्यवस्थेच्या जवळीकतेतूनही आता सामाजिक दर्जा प्राप्त करून घेता येऊ लागला. राज्यसंस्थेच्या या नव्या स्वरूपामुळे नव्या राजकीय जाणीवा निर्माण होऊ लागल्या व त्यांची अभिव्यक्ती धर्म-संस्कृती क्षेत्रात होऊ लागली. भांडवली व्यवस्थेच्या प्रभावातून आलेल्या वर्गव्यवस्थेलाही पारंपारिक जातिव्यवस्थेच्या मर्यादेतच अडकून पडावे लागले. असे असले तरी लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य आदि भांडवली मूल्यांचा प्रसार झाला. भारतीय जातिसमाजावर झालेल्या या वर्गीय परिणामामुळे धार्मिक व सामाजिक क्षेत्रात बदल घडून आले.[४] या सर्व ताण्याबाण्यांचा परिणाम महाराष्ट्रातील जैन समाजातील समाजव्यवहारांवर पडणे साहजिकच होते. त्यातही दिगंबर जैन समाज सर्व सामाजिक व आर्थिक स्तरात वितरीत झालेला असल्यामुळे वसाहतिक महाराष्ट्रातील दिगंबर जैन समाजात काय घडामोडी घडत होत्या हे तपासणे उद्‌बोधक ठरेल. वसाहतिक महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाचा अभ्यास दोनच भिंगांतून पाहिल्यामुळे अशा अभ्यासाला मर्यादा पडतात. एक तर तो 'उच्च जाती प्रभुत्व' या किंवा 'ब्राह्मणेतर व दलित जातजाणीव जागृती' अशा दोन बिंदूंभोवती फिरत असल्यामुळे अन्य जाती समाजाचे अभ्यास काहीसे मागे पडले. त्यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात अनेक जातिसमूहांना फारसे स्थान मिळाले नाही.[५] या संदर्भाने वसाहतिक सत्तेचा, तिच्या आपले प्रभुत्व निर्माण करणाऱ्या साधनांचा महाराष्ट्रातील सर्व समाज घटकांवर प्रभाव पडत असताना वरील दोन संदर्भबिंदू सोडून अन्य समाज घटकांचा अभ्यास पुढे आणणे हा प्रस्तुत अभ्यासाचा प्रमुख उद्देश मानला आहे. महाराष्ट्रातील दिगंबर जैन पंथामध्ये विविध जाती आहे. यात बाराव्या-तेराव्या शतकापासून ते अगदी आजपर्यंत उत्तर व पश्चिम भारतातून होत असलेल्या स्थलांतरामुळे स्थलानुरूप विविध प्रारूपे तयार झालेली आहेत. येथे वसाहतिक काळातील महाराष्ट्रातील म्हणत असताना तत्कालीन मुंबई प्रांत (Bomaby Presidency) हा भौगोलिक प्रदेश अपेक्षित आहे तसेच हा अभ्यास या भौगोलिक प्रदेशातील जैन धर्मातील दिगंबर पंथातल्या काही जाती संदर्भापुरता मर्यादित आहे.


UGC Care Listed Journal : ISSN : 0976 - 5425

Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

भारतातील वसाहतिक कालखंड सगळीकडे सारखा नसून प्रदेशानुरूप त्यात बदल आहेत. महाराष्ट्रातील वसाहतिक कालखंड ढोबळमानाने इ. स. १८१८ पासून इ. स. १९४७ पर्यंत असून यातही त्याचे विविध टप्पे पडतात. इ. स. १८५७ च्या उठावानंतर ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीकडून भारतातील ब्रिटिश प्रदेशाचे नियंत्रण थेट ब्रिटनच्या सरकारकडे गेले. इ. स. १८५७ मध्ये महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ मुंबई येथे स्थापन झाले. शिक्षणाचा प्रसार सुरुवातीला उच्च वर्णजातींप्रमाणे वर्णजाती उतरंडीच्या मध्यल्या व तळातल्या वर्णजातींना शिक्षण उपलब्ध झाले असले तरी तशी पार्श्वभूमी व समाजातील उच्च वर्णजातींचे प्रभुत्व पाहता या जातीसमूहांचेच शिक्षण घेण्यात अग्रेसरत्व राहिले.[५] या अर्थाने हा अभ्यास इ. स. १८८० नंतर जेव्हा निम्न वर्णजातीतील लोक शिक्षित होऊ लागले तेथून करावा लागतो. या जातींचे एकूण वर्णजातींच्या उतरंडीतील स्थान लक्षात घेता त्यांचे परस्परांमध्ये "जैन" म्हणून काही जैविक नाते होते का की त्यांच्यात परस्पर स्पर्धा, सहकाराची भावना, संघर्ष होते का यांनी वसाहतिक सत्तेच्या प्रशासकीय, आर्थिक व घटनात्मक उपाययोजनांना नेमका कसा प्रतिसाद दिला हा प्रतिसाद उपरोल्लेखित दोन संदर्भबिंदूंच्या प्रतिसादापेक्षा वेगळा होता का हे तपासणेसुद्धा महत्त्वाचे ठरते.

इ. स. १८५८ मधील राणीच्या जाहीरनाम्यानंतर ब्रिटिश भारतात राजकीयदृष्ट्या घटनात्मक वाटचाल सुरु झाली. प्रतिनिधित्वाच्या राजकारणाला (Politics of Representation) सुरुवात झाली. इ. स. १८५७ च्या उठावानंतर भारतीयांना जाणून घेणे, त्यांची वर्ण, जात, व्यवसाय, प्रांत तसेच भाषा अशा अनेक कोटीक्रमांत विभागणी सुरु झाली. यातून पूर्वेकडच्या जगाची विशिष्ट जाणीव निर्माण झाली (Orientalism). दशवार्षिक जनगणनेसोबतच मुंबई प्रांतातील आदिवासी आणि जातींचे जे अभ्यास ब्रिटिशांनी केले त्यात जैन धर्मातील जातींचादेखील समावेश साहजिकच करण्यात आला. यात ब्रिटिशांनी गुजरातमधील जैन जाती ३१ सांगितल्या तर डेक्कन म्हणजे गुजरात सोडता उर्वरित मुंबई प्रांताचा समावेश होतो. येथे जैनांच्या ०५ जाती नोंदविल्या आहेत. यात हुम्बड, गांधी, शेतवाळ, कासार, श्रीमाली वाणी, मोढा वाणी, लाड वाणी, मारवाडी वाणी, पोरवाल, चतुर्थ, पंचम, उपाध्ये इत्यादी जाती नमूद आहेत.[७]



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

घटनात्मक उपाययोजना, प्राच्यविद्या विशारदांनी निर्माण केलेले विशिष्ट ज्ञान / धारणा, ख्रिश्चन मिशनऱ्यांनी हिंदू धर्म व वर्णजाती उतरंडीवर केलेली टीका व त्याला एतद्देशियांनी दिलेला प्रतिसाद हा एक तर धर्मजाती सुधारणा किंवा धर्मजातींचे पुनरुज्जीवन (Revival) करणारा होता. यातून परंपरा व नवता (Tradition and Modernity) असा संघर्ष तत्कालीन समाजात उद्भवला. यामुळेएकीकडे आधुनिकतेच्या आवरणाखाली वर्णजातींचीच चर्चा केंद्रस्थानी आली. त्याला भांडवलशाहीने वर्ग जाणीवेची जोड दिली. शिक्षण व कायदेपद्धती तसेच प्रशासनातील बदल यातून महाराष्ट्रात मध्यम वर्ग विकसित होत राहिला.[८] या आधुनिक नवशिक्षित तरुणांनी धर्मसुधारणा व समाजसुधारणा हाती घेतल्या. धर्मजिज्ञासा व समाजसुधारणा या प्रस्तुत काळातील प्रमुख प्रेरणा होत्या व या प्रेरणांचे वहन सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी वृत्तपत्रे/ मासिकांचा उपयोग महाराष्ट्रात झालेला दिसतो. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात वृत्तपत्रे व ग्रंथव्यवहार सुरु झालेला दिसतो. अर्थात या व्यवहारात शिक्षणात अग्रेसर राहिलेल्या वर्णजातींचेच वर्चस्व राहिले[९] परंतु जसे तथाकथित निम्न जातींमध्ये शिक्षण पोहोचले तसे या वर्णजातीतील नवशिक्षितांनी आपापल्या जाती समाजांमध्ये जाती उन्नतीचे प्रयत्न सुरु केले.

जैन समाज व्यापाराशी जोडलेला असल्यामुळे या समाजात साक्षरतेचे प्रमाण चांगले राहिले आहे. त्यामुळे सामाजिक पातळीवर विविध प्रकारचे साहित्य निर्माण होत राहिले.[१०] यात वृत्तपत्रे होती तसेच ग्रंथ प्रकाशित केले जात. प्रकाशित होणाऱ्या ग्रंथांचे विषय जरी मुख्यत: धार्मिक असले तरी वृत्तपत्रांमधून मात्र अनेक सामाजिक, राजकीय, आर्थिक चर्चा होत होती.[११] दिगंबर जैन समाजातही या प्रकारचे कार्य करण्यासाठी काही स्वतंत्र तर वसाहतिक राज्यव्यवस्थेचे निर्माण केलेला अवकाश प्राप्त करण्यासाठी ज्या जातिधर्माधारित संघटना निर्माण झाल्या त्यांची मुखपत्रे म्हणूनही काही वृत्तपत्रे सुरु झाली. या वृत्तपत्रांद्वारे तत्कालीन प्रश्नांची चर्चा केलेली तर आहेच परंतु त्याचबरोबर अन्य अनेक बाबींवर प्रकाश पडतो. समाजांतर्गत चालणाऱ्या अनेक घडामोडी या पत्रांमधून शोधता येतात. सामाजिक परिवर्तनाची भूमिका घेऊन या पत्रांनी धर्मप्रचार तसेच धर्मजागृतीबरोबरच धार्मिक शिक्षणामध्ये अभिरुची निर्माण करण्याचे कार्य केले.[१२]



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

येथे श्रीजिनविजय[१३] जैनमित्र व सत्यवादी या तत्कालीन पत्रांचा उपयोग केला आहे. जैनमित्राच्या सन १९०० च्या अंकात पत्राचा मुख्य उद्देश पत्राच्या शीर्षकाखाली जो विचार सूत्ररूपाने मांडला आहे त्यातूनच स्पष्ट होतो. 'बोधवित्त उन्नतीनिमित्त, जैनमित्र अवतार'[१४] विविध विषयांचा बोध घेऊन वित्त अर्जित करून प्रगती साधावी यासाठी हे पत्र कार्य करेल, असे यातून पत्रकर्त्यांना सूचित करावयाचे आहे. अर्थात हा लाभ सर्व जैन जातींना उपलब्ध असणार किंवा कसे हे यातून काही स्पष्ट होत नाही. पुढे हे पत्र 'दिगंबर जैन प्रांतिक सभा बंबई' यातून स्पष्ट होते. मुंबईची प्रांतिक सभा असतानादेखील 'दक्षिण महाराष्ट्र जैन सभा' ही मुंबई प्रांतातील दक्षिणेतील संस्थाने व ब्रिटिश प्रांतातील काही भाग येथे स्वतंत्र संघटना निघाली तसेच 'महाराष्ट्र खंडेलवाल दिगंबर जैन सभा'[१५] ही स्वतंत्र संघटना काढण्याची गरज तत्कालीन महाराष्ट्रातील खंडेलवाल जातीच्या जैनांना वाटली. याचे कारण जसे वसाहतिक महाराष्ट्रातील प्रतिनिधित्वाच्या राजकारणात आहे तसेच त्या त्या जातीची जातिविशिष्टता हे देखील आहे. जैनांनी काढलेल्या पत्रांमधून 'वित्त' चा विचार महत्त्वाचा मानलेला दिसतो. 'दर्पण' पासून एकोणविसाव्या शतकातील प्रमुख मराठी वृत्तपत्रांचा मुख्य विषय शिक्षण, समाजसुधारणा, धर्मसुधारणा कधी वसाहतिक राजवटीवर टीका असे स्वरुप दिसते. त्या अर्थाने या तिन्ही पत्रांत कारखानदारी, वित्त, व्यवसाय असे विषय हाताळलेले दिसतात. दि.०३-०४-१९१६ च्या प्रगती आणि जिनविजयच्या अंकात एका इंग्रजी दैनिकात प्रसिद्ध झालेल्या लेखाचा सारांश देऊन 'उद्योगधंदे कशाने वाढतील' याची चर्चा केली आहे. साखर कारखाने किफायतशीर राहतील का? याची सविस्तर चर्चा अन्य अंकांत दिसते. यातून वसाहतिक राजवटीमुळे उपलब्ध झालेला भांडवलशाहीचा अवकाश प्राप्त करून घेण्याची मनीषा व्यक्त होताना दिसते. त्याचबरोबर वर्गोन्नतीच्या दिशेने प्रयत्न दिसतात. या क्षेत्रात जैन जातींमध्ये सहकार्याची भावना दिसते. सहकार्याचे दुसरे क्षेत्र होते शिक्षण. वसाहतिक महाराष्ट्रात शिक्षणाशिवाय प्रगती होणार नाही तसेच आधीच संकुचित असलेल्या नोकरीच्या संधी यातून आधुनिक शिक्षण घेण्याची गरज निर्माण झाली होती. शिक्षणाच्या मर्यादित संधी व त्यातील अडचणी दूर करून नवशिक्षितांनी आपापल्या जातीतील लोकांना शिक्षण घेण्यासाठी उद्युक्त करण्याचा प्रयत्न केला. वसाहतिक प्रारुपातून स्त्रीशिक्षणाची गरज प्रतिपादिली. या काळातील जातीय साधनस्त्रोतांच्या मदतीने वर्गाच्या साधनस्त्रोतांना आत्मगत करण्याचा व त्यावर ताबेदारी ठेवण्याच्या प्रयत्नांचा हा भाग होता.[१६]



Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

श्री जिनविजय मासिकाच्या जून १९०२ सालच्या अंकात 'दक्षिण महाराष्ट्र जैन समाज सभेचे हेतू काय आहेत?' या शीर्षकाचा लेख लिहून सभेचे पहिले महामंत्री श्री आप्पाजी बाबाजी हंजे यांनी सभेची भूमिका स्पष्ट केली आहे. त्यात ते म्हणतात, हिंदुस्थानच्या राज्यकारभारात ज्याचे वजन आहे असा एक तरी जैन इकडे आहे काय? आम्हा जैनांना धर्माचे ज्ञान काडीभर नाही, आमचे गुरु कर्तव्यच्युत झाले आहेत आणि राजभाषा येत नसल्यामुळे आम्हाला जगात काहीच मान राहिला नाही !.. ही मलिनता दूर होऊन आम्हामध्ये धर्मविद्या व राजविद्या पसरली तरच पुन: एकदा आमचे डोके वर निघू शकेल !.. सभेची खटपट मुख्यत: पाठशाळा काढून धर्माचे ज्ञान असणारे विद्वान शास्त्री जैनात निपजविण्याची आहे. इंग्रजी शिकवून जैनांना गव्हर्नरच्या दरबारांपर्यंत व विलायतेपर्यंत ण्याचाही सभेचा हेतू आहे. यावरुन सभेची भूमिका स्पष्ट होते. याच प्रकारे जैनमित्राच्या तृतीय वर्षाच्या पहिल्या अंकाची सुरुवातच 'अज्ञानतमो हन्तु विद्याधनयोगविघ्नसिध्यर्थम' या श्लोकाने होते तसेच सत्यवादीचे प्रयोजनच (खंडेलवाल) जातीमध्ये शिक्षणाचा प्रसार करुन घोर निद्रेतून जागवण्याचा असल्याचे पहिल्याच अंकात नमूद केले आहे. शिक्षणाच्या व्यापक मुद्यावर जरी सहकार्याची भावना असली तरी सत्यवादीच्या एका अंकात खंडेलवाल जातीच्या पंचायत सभेचे नियम दिले आहेत. त्यात स्त्रियांना सभासदत्व असले तरी सभेच्या कार्यात सोळा वर्षांच्या वरच्या पुरुषांनाच सहभागी होता येईल असे नमूद केले आहे तर 'श्री जिनविजय' मध्ये स्त्री शिक्षणाचा जोरदार पुरस्कार केलेला दिसतो. अर्थात या शिक्षणाचा उपयोग धार्मिक ग्रंथ वाचणे, हिशेब ठेवता येणे इथपर्यंतच अपेक्षित आहे. स्त्री-शिक्षण हा संघर्षाचा मुद्दा राहिलेला दिसतो.

बालविवाह, जरठबाला विवाह, कन्याविक्रय आदि कुरीतींविरोधात जवळपास सर्वच जातींमध्ये विरोध करण्यावर सहमती व सहकार्य असले तरी विधवा विवाहाच्या बाबतीत तसेच पोटजातींमध्ये लग्नसंबंध असावेत की नसावेत यावरुन जाती-जातींमध्ये तसेच जाती अंतर्गतदेखील संघर्ष निर्माण झाले. खंडेलवाल जातीप्रणीत सत्यवादीने विधवा विवाहास विरोध केला तर दक्षिण महाराष्ट्र जैन सभाप्रणीत प्रगती आणि जिनविजयने विधवा विवाह व दिगंबर जैनांच्या पोटजातीतील विवाहांचा पुरस्कार केला. अर्थात यावरुन पंचम व चतुर्थ जातींमध्ये वादावादी झाली. त्यातून चतुर्थ जातीने सन १९०३ साली 'श्री जिनसेन महासभा'



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ही वेगळी संघटना केली. ज्या अनेक पोटजातींची संकीर्णता मोडून एक जैन जात करण्याचे समकालीन मध्यमवर्गाच्या सुसंगत धोरणाने द. म. जै. सभा ही संघटना निर्माण केली होती त्या प्रयत्नांनाच तडा जात असलेला पाहून सुधारक वर्गाने 'मठांची सुधारणा', 'आंतरजातीय विवाह' यांसारख्या वादग्रस्त विषयांवर सभेमध्ये यापुढे चर्चा होणार नाही, असे मान्य करून समेट केला.[१७] सुधारणांना अजून काही वेळ देण्याची गरज लक्षात घेऊन पुढे नंतर सभेने पुन्हा हा मुद्दा लावून धरलेला दिसतो. सभेच्या २५ व्या अधिवेशनात मंजूर झालेले ठराव बघितले तर त्यात पहिलाच ठराव 'दिगंबर जैन समाजातील पोटजातील रोटीबेटी व्यवहार होऊन ऐक्य होणे अवश्य आहे, असे या सभेचे मत आहे' असा आहे.

वसाहतकालीन भारतात या काळी दिगंबर जैन समाजात समाजसुधारणा करण्यावरून दोन पक्ष पडले होते ते नवशिक्षित, सुधारणावादी 'बाबू पक्ष' व प्रतिगामी 'पंडित पक्ष', 'बाबू पक्षाने' जातीच्या मर्यादा ओलांडून परस्परांस सुधारणेच्या मुद्यांवर साहाय्य केले तर 'पंडित पक्षाने' आपले वर्चस्व कायम ठेवून सुधारणांना हाणून पाडण्याचे धोरण राबविले. 'भारतवर्षीय दिगंबर जैन महासभेच्या' शेडबाळ येथील अधिवेशनांच्या गाजलेल्या प्रसंगी हे विरोध उफाळून आले, याचा संपूर्ण वृत्तान्त दि. २७-१२-१९२४ च्या 'प्रगती आणि जिनविजय' च्या अंकात दिला आहे. 'बाबू पक्षाने' जातीच्या मर्यादा ओलांडून सहकार्य करणे व स्वजातीय 'पंडित पक्षास' विरोध, प्रसंगी संघर्ष करणे यातून जातीच्या मर्यादा ओलांडून वर्गीय पातळीवर एकत्र येण्याची प्रक्रिया दिसते तर स्वजातीत सुधारणा करण्याची आकांक्षा भारतातील वर्गोन्नतीला जातीच्या मर्यादेत अडकून पडावे लागल्याचे निदर्शक आहे. थोडक्यात, वर्गोन्नती व जातीसुधारणा या सहकार - संघर्षातून एकमेकांना प्रभावित करीत राहिल्या.

संदर्भ :-


(१) Gopal Surendra, Jains in India Historical Essays, New Delhi, Manohar Publishers & Distributors, 2019.

(२) Scholz Sabine, The Digambara Jains of South Maharashtra and North Karnataka since the Late 19th Century] Towards the Establishment of Collective Religious Identity and a Digambara Jaina Community, A Thesis Submited to the University of Manchester, 2011.





Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

(३) Cort John E., Jains in the World : Religious Values and Ideology in India, New York, Oxford University Press, 2001. https://books.google.co.in Accessed on : 05-01-2020 10:10 UTC.

(४) बगाडे उमेश, महाराष्ट्रातील प्रबोधन आणि वर्गजातिप्रभुत्व, सुगावा प्रकाशन, पुणे, २००६.

(५) Vaidya Monika, Consolidation of Jati in Colonial India, In Seshan Radhika et. al. Re-Searching Transitions in Indian History, London, Routledge, 2019.

(६) दीक्षित राजा, एकोणविसाव्या शतकातील महाराष्ट्र, मध्यमवर्गाचा उदय, पुणे, डायमंड पब्लिकेशन्स, २००९.

(७) Enthoven R. E., The Tribes and Castes of Bombay, Bombay Government Central Press, 1920.

(८) दीक्षित राजा, उपरोक्त, पृ. २२.

(९) लेले रा. के., मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, पुणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन, २००९.

(१०) Gopal, Ibid, P. 17.

(११) संगवे विलास, दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास, सांगली, दक्षिण भारत जैन सभा, १९७६.

(१२) संगवे विलास, मराठी जैन पत्र-पत्रिकाएँ, उद्‌भव, परंपरा, विकास, जैन, नेमिचंद (संपा.), तीर्थकर - जैन पत्र पत्रिकाये विशेषांक, इंदोर, हीरा भैया प्रकाशन, ऑगस्ट - सप्टेंबर १९७७.

(१३) चौगुले फडयाप्पा (संपा.), प्रगती आणि जिनविजय (पाक्षिक), बेळगाव, दक्षिण महाराष्ट्र जैन सभा.

(१४) बरेय्या गोपालदास (संपा.), जैनमित्र (मासिक), मुंबई, दिगंबर जैन प्रांतिक सभा.

(१५) कासलीवाल धन्नालाल (संपा.), सत्यवादी (मासिक), मुंबई, महाराष्ट्र खंडेलवाल दिगंबर जैन पंच सभा.

(१६) बगाडे उमेश, आधुनिक महाराष्ट्राची समाजभूमी, लोकसत्ता, औरंगाबाद आवृत्ती, दि. ०८/०१/२०२०.

(१७) संगवे, उपरोक्त, पृ. ४१ - ४४.

Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

○○○



View publication stats